राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांना सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पिय अनुदानातून लेखाशिर्ष (२२१० ४४७३), ३१ सहाय्यक अनुदाने या खाली रु. ९०.०० लक्ष निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः रक्तसं-३०२६/१३३/प्र.क्र.९२/असंसर्ग-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: ०१ सप्टेंबर २०२६

वाचा -

१) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६
२) संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचे पत्र क्रमांकः रा.र.सं.प/लेखा/डेस्क३/फाईल क्र.६०८/२०२५, दि.११.०५.२०२६
३) सहा. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांचे पत्र क्रमांक रा.र.सं.प/लेखा/डे-३/फाईल क्र.८७५/२०२६, दि. २१.०७.२०२६

प्रस्तावना -

वाचा मधील अ.क्र. ३ येथील दि. २१.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांनी विनंती केल्याप्रमाणे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतन, आस्थापना खर्च, वाहनांची दुरुस्ती/ डिझेल देयके, हाऊसकिपिंग , सुरक्षा रक्षक इत्यादी देयके अदायगी करण्यासाठी लेखाशिर्ष २२१० ४४७३, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांच्यासाठी निधी BEAMS प्रणालीवर उपलब्ध करुन वितरीत करण्यास सहमती देण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावासंदर्भात वित्त विभागाने रु. ९०,००,०००/- (रुपये नव्वद लक्ष फक्त) इतका निधी अर्थसंकल्पिय प्रणालीवर वितरित करण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन, आस्थापना खर्च, वाहनांची दुरुस्ती/ डिझेल देयके, हाऊसकिपिंग , सुरक्षा रक्षक इत्यादी देयके अदायगी करण्यासाठी लेखाशिर्ष २२१० ४४७३, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांच्यासाठी

रु. ९०,००,०००/- (रुपये नव्वद लक्ष फक्त) इतका निधी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाण तसेच खालील नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) प्रणालीवर वितरीत करुन विहित कार्यपध्दतीने खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२ सदर मंजूर अनुदानातून राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या रक्त संक्रमण या लोकोपयोगी योजनेचा खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे तपशिलवार खर्च भागविण्यात यावा.

निधी वितरणाचा तपशील

(रक्कम रुपयात)

अ.क्र.	खर्चाचा तपशील	वितरणासाठीचा निधी
१	राज्य रक्त संक्रमण परिषद येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन, भविष्य निर्वाह निधी, अतिकालीक भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते अदा करणे	रु. ३०,००,०००/-
२.	सर जे.जे. महानगर रक्तपेढी, भायखळा येथील मनुष्यबळ सेवा, हाऊसकिपिंग, सुरक्षा रक्षक, बायोमेडिकल वेस्ट, इलेक्ट्रिल देखभाल इत्यादी सेवा पुरविण्यात येणाऱ्या संस्था/कंत्राटदारांचे देयक अदा करणे.	रु.२५,००,०००/-
३.	शासकीय रक्तपेढीतील रक्तघटक विलगीकरणासाठी जिल्हा स्तरावर कंत्राटी स्वरुपाने नियुक्त करण्यात आलेल्या टेक्नीकल सूपरवायझर यांच्या वेनाचा निधी पाठविण्याबाबत.	रु.३०,००,०००/-
४.	खारघर प्रशिक्षण केंद्र येथील हाऊसकिपिंग, सुरक्षा रक्षक, इलेक्ट्रिकल देखभाल, लिफ्ट देखभाल इत्यादी सेवा पुरविण्यात येणाऱ्या संस्था/कंत्राटदारांचे देयक अदा करणे	रु. ५,००,०००/-
	एकूण	रु. ९०,००,०००/-

३. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या प्रयोजनासाठीच खर्च करण्याची संपूर्ण जबाबदारी संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांची राहील.

४. सदर बाबीवरील खर्च मागणी क्र. आर-१, २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१- नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा, ११०- रुग्णालये व दवाखाने, राज्य योजनांतर्गत योजना, (०६) (२५) रक्त संक्रमण सेवा, ३१- सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२१० ४४७३) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरिता सहाय्यक अनुदान वितरणाचा प्रस्ताव, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२५ निधी वितरणाबाबत वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६ मधील अटींची पूर्तता होत आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्तावाशी संबधित लेखाशिर्षाखाली ३ महिन्यापूर्वी वितरित केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखा परिक्षण /महालेखापाल यांचे गंभीर आक्षेप नाहीत. या योजनेतंर्गतचा निधी लाभार्थ्यांच्या थेट खात्यात जमा होत नाही. सदर योजनेंतर्गत वस्तू खरेदी प्रस्तावात खरेदी नियोजन करण्यात येते व आवश्यकतेनुसार दरकरारावर खरेदी करण्यात येते. तसेच भांडवली वस्तुंच्या खरेदीनंतर डेड स्टॉक रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येते. सदर योजनेच्या संबंधित लेखाशिर्षखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

६. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

७. राज्य रक्त संक्रमण परिषदेस वितरीत अनुदानाशी संबंधीत खर्चाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्रशासकीय अधिकारी आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना व सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाने अनौ.संदर्भ क्र.५६२/व्यय-१३/२०२६, दि. १०.०८.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९०१११११७३८१११७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.09.01 12:30:50 +05'30'

(अ.भि.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे

३. संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
४. सहसंचालक (रुग्णालय), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
५. सहाय्यक संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई.
६. सहाय्यक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
८. अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प शाखा), (लेखा शाखा), मंत्रालय, मुंबई.
९. कक्ष अधिकारी (व्यय-१३/अर्थसंकल्प-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.कक्ष अधिकारी/का१४७२, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.निवडनस्ती (असंसर्गजन्य आजार-२)